## प्रकरण चौथे

# दै. लोकमत व दै. संध्यानंद यांचे घटकनिहाय आशय विश्लेषण

## प्रकरण - ४

# दै. लोकमत व दै. संध्यानंद यांचे घटकनिहाय आशय विश्लेषण

४.१ प्रस्तावना

४.२ आशय विश्लेषण पध्दती

४.३ आशय विश्लेषण पध्दतीचे उपाययोजन

४.४ घटकनिहाय विश्लेषण

४.५ वर्तमानपत्रनिहाय विश्लेषण

४.५.१ दैनिक लोकमतमधील मनोरंजनात्मक वार्तांचे घटकनिहाय मुद्रित क्षेत्रफळ व टक्केवारी

४.५.२ दै. संध्यानंद मधील मनोरंजनात्मक वार्तांचे घटकनिहाय मुद्रित क्षेत्रफळ व टक्केवारी

४.५.३ दै.लोकमत व दै. सध्यानंद मधील मनोरंजनात्मक वार्तांचा घटकनिहाय मुद्रित क्षेत्रफळ व टक्केवारी दर्शवणारा तुलनात्मक आलेख

## ४.१ प्रस्तावना :

आशय विश्लेषण तंत्राचा उपयोग हा सर्व प्रकारच्या जनसंवाद माध्यमांच्या कार्याचे मुल्यमापन करण्याचे शास्त्रीय साधन म्हणून केला जातो. कोणत्याही नवीन विषयाचे स्वरुप व वृत्तपत्राच्या अभ्यासासाठी व समिक्षेसाठी आशय विश्लेषण ही पध्दती उपयुक्त आहे. शब्द, वाक्य, परिच्छेद आणि काळ या विश्लेषणाची एकके आहेत. पी.व्ही.यंग आशय विश्लेषणाविषयी असे म्हणतात की, ''आशय विश्लेषण हे पध्दतीशीर विश्लेषणाचे फळ आहे व ते पायाभरणी, आकारणी, वर्गीकरण तथ्ये व आलेख याची सुसंगती घडवून संख्यात्मक आणि गुणात्मक विश्लेषणाचा आधारे तथ्यापर्यंत पोहचता येते'' [१]

आशय विश्लेषण ही सामाजिक शास्त्राप्रमाणेच जनसंवाद शास्त्रात वापरली जाणारी सर्वसामान्य संशोधन पध्दती आहे. या पध्दतीमध्ये दस्तऐवज, लिखित व मुद्रित सामुग्रीचे वर्णन विश्लेषण करुन पडताळून पाहता येते. ही एक वस्तुनिष्ठ तसेच संख्यात्मक विश्लेषण पध्दती मानली जाते तसेच काही वेळा गुणात्मक विश्लेषणही केले जाते. अभ्यास करावयाची पध्दती कितपत योग्य आहे ते प्रथम पाहावे लागते व सामुग्रीची निवड केल्यानंतर ती नोंदली जाते. घटक निश्चिती करुन हे घटक अभ्यास विषयाशी कसे सुसंगत आहेत त्यावर त्याचे आकलन अवलंबून असते.

यथार्थ सामग्रीची निवड करतांना आशय विश्लेषण हा महत्त्वाचा टप्पा असतो. संशोधन विषयासाठी सुसंगत सामुग्री प्रथम निवडून त्यावर भाष्य करण्यासाठी तिचे घटक ठरवावे लागतात. सर्व सामुग्रीतून प्रत्यक्ष नमुना निवडला की, त्याचे आकलन करावे लागते. या प्रत्येक घटकाची व्याख्या करावी लागते.

मनोरंजनात्मक पत्रकारितेचा चिकित्सक अभ्यास (दै. संध्यानंद व दै. लोकमत वाचकांच्या विशेष संदर्भात अभ्यास या विषयावर संशोधन करीत असतांना प्रादेशिक

वृत्तपत्रांच्या औरंगाबाद येथून प्रकाशित होणाऱ्या आघाडीच्या अशा दै. लोकमत व पुणे येथून प्रकाशित होणाऱ्या दै. संध्यानंद या दोन दैनिकाचा आशय विश्लेषण पध्दतीद्वारे जानेवारी २०१४ ते २०१५ या कालावधीतील नमुना अंकाची निवड करुन त्याद्वारे वैज्ञानिक पध्दती वापरुन आशय विश्लेषण करण्यात आले आहे. या आशय विश्लेषण तंत्राविषयी सामाजिक शास्त्र संशोधनातील तज्ञ कार्लीगज म्हणतात की, Content analysis is a method of communication analysis, as well as a method of observation is a versalite research technique in mass communication, as well as in social science research, where data obtained from archival records & documents can be analysed systematically & scientifically to draw valid conculustion.) [२]

प्रादेशिक वृत्तपत्राच्या बदलत्या स्वरुपाबद्दल तसेच जागतिकीकरणानंतर प्रादेशिक वृत्तपत्रात झालेले तांत्रिक बदल बघता मनोरंजन पत्रकारितेचे संदर्भ बदलले आहेत. विसाव्या शतकाच्या शेवटी बदलत्या काळात राजकीय आणि आर्थिक क्षेत्रातील घडामोडीचा परिणाम जीवनाच्या सर्व क्षेत्रांवर झाला, संवाद तंत्रज्ञानावरही त्याचा परिणाम झाला. जागतिक, अखिल भारतीय व प्रादेशिक वृत्तपत्रेही यास अपवाद राहिली नाही. मनोरंजन पत्रकारितेतही अमुलाग्र बदल घडले आहेत.

या अभ्यासासाठी निवडलेल्या २ प्रमुख वृत्तपत्राच्या आवृत्त्यामधून नमुना निवड करीत असतांना १८ महिन्याचा कालावधी घेण्यात आला आहे. यामध्ये २०१४ ते २०१५ च्या निवडक अंकाची नमुना निवड पध्दतीने निवड करण्यात आली आहे. यासाठी शास्त्रोक्त पध्दतीने पुढील नमुना निवड पध्दती वापरण्यात आली आहे.

## ४.२ आशय विश्लेषण पध्दती :

माध्यम संशोधनात आशयविश्लेषण ही एक तथ्य संकलन पध्दती असते. या पध्दतीमुळे आशयाचे विश्लेषण करता येते. या तंत्राद्वारे आंतरिक तथ्य वा आशय याचेही विश्लेषण केले जाते. गुणात्मक तथ्याचे सांख्यिकीय व वस्तुनिष्ठ तथ्य रुपांतर या पध्दतीने करता येऊ शकते. एखाद्या वृत्तपत्रात विविध प्रकारच्या मुद्रित मजकूर असतो. त्या अनुरुप मजकुराचे त्यातील तथ्यांचे, विषयाचे विश्लेषण करता येते.

आशय विश्लेषण म्हणजे काय हे सांगतांना पी.व्ही.यंग म्हणतात की, ‘‘मुलाखत, प्रश्नावली, अनुसूची व इतर लिखित किंवा मौखिक माध्यमातून संकलित केलेल्या तथ्याच्या आशयाचे व्यवस्थित वस्तुनिष्ठ व परिणामात्मक वर्णन करण्याचे संशोधन तंत्र म्हणजे आशय विश्लेषण होय.’’ [३] लिखित आणि मौखिक माध्यमातून जमवलेल्या माहितीचे वस्तुनिष्ठ व परिणामकारक वर्णन करण्यावर त्यानी भर दिलेला आहे.

ए.ए. बर्जर यांनी माध्यम विश्लेषणाच्या पध्दती मध्ये आशय विश्लेषण या पध्दतीवर भर दिला आहे. त्याच्या मते, ‘‘आशय विश्लेषण म्हणजे माध्यमातील सुप्त आशयातील अंतरंग शोधणे होय’’ [४] आशय विश्लेषणा बाबत एस.बी. शर्मा व श्वेता बझी व्याख्या करतांना म्हणतात की, ‘‘The team content refers to the message that in distributed by the man, media organization by means of the mass communication channel.’’ [५]

## ४.३ आशय विश्लेषण पध्दतीचे उपाययोजन :

आशय विश्लेषण पध्दतीने वापरतांना घटक निश्चिती, कालावधी निश्चित आणि मापनाचे एकक निश्चित करावे लागतात तसे केल्याशिवाय ही पध्दती का व कशी वापरली आहे ते समजू शकत नाही. या पध्दतीच्या प्रत्यक्ष वापराबाबत भांडारकर म्हणतात की, ‘‘जर

समान घटक असतील व योग्य पध्दती विकसित केली असेल तर येणारे निष्कर्ष समसमान असतात." [६] या पार्श्वभूमीवर या अभ्यासासाठी ही पध्दती कशी वापरली आहे ते खालील प्रमाणे स्पष्ट केले आहे.

**१. घटक निश्चिती :**

प्रस्तुत तौलनिक अभ्यासासाठी १० प्रमुख घटक निवडले असून हे घटक संगीत, विनोद, कला, खेळ, कार्टून, गोष्टी, चित्रपट, सर्कस, जाहिरात व इतर मनोरंजनात्मक घटक या पैलूवर भर देण्यात आला आहे. त्याचा हेतू या घटकाचे तौलनिक विश्लेषण करणे हा आहे.

**२. कालावधी :**

प्रस्तुत संशोधनाचा हेतू तौलनिक अध्ययन असल्यामुळे माध्यम जगतातील माहिती तंत्रज्ञानाचा वाढता वापर आणि त्यामुळे दैनदिन दैनिकाचे वाढलेले वाचक या पर्श्वभूमीवर राष्ट्रीय व प्रादेशिक भाषेतील दैनिकाचा आशय आणि दर्जाबाबत नव्याने चर्चा सुरु झाली आहे. या पार्श्वभूमीवर प्रस्तुत संशोधनात दै. लोकमत व दै. संध्यानंद या वर्तमानपत्राचा अभ्यास करण्यात आला आहे. आशय विश्लेषण पध्दतीने या संशोधन तंत्राद्वारे दर्जा व आशयाचा अचूकपणे अंदाज बांधता येत असल्यामुळे या दोन दैनिकाच्या आवृत्तीचा दर्जा व आशचाचा अभ्यास करण्यासाठी आशय विश्लेषण तंत्र वापरले आहे. आवृत्त्याचे आशय विश्लेषण करण्यात आले आहे. व्यष्टी अध्ययन पध्दतीद्वारे एखाद्या संशोधन विषयाचा अभ्यास करण्यासाठी अशा प्रकारच्या कालावधी निश्चित करण्यात येतो.

आशय विश्लेषणासाठी शास्त्रीय पध्दतीने नमुना निवड करता यावी यासाठी २०१४ ते २०१५ या कालावधीतील निवडक अंकाची निवड करण्यात आली आहे.

**३. मापन पध्दती :**

या अभ्यासाचे आकलन करतांना मजकुर घटकानुसार जागेमध्ये मोजला आहे. ही जागा मोजून त्या आधारे विश्लेषण केले आहे. तथापि प्रमुख भर गुणात्मक विश्लेषणावर आहे.

**४. अभ्यासासाठी निवडलेल्या वर्तमानपत्रांची ओळख :**

या अभ्यासासाठी महाराष्ट्रातील दै. लोकमत व द. संध्यानंद या प्रतिष्ठित वृत्तपत्राची निवड करण्यात आली आहे.

**१. दै. लोकमत :**

महाराष्ट्रातील सर्वाधिक खपाचे वृत्तपत्र असलेले 'दै. लोकमत' च्या नागपुर, पुणे, मुंबई, औरंगाबाद, नाशिक, कोल्हापूर, सोलापूर, जळगाव, सातारा, सांगली, रत्नागिरी, अहमदनगर, अकोला येथून मुद्रित आवृत्त्या प्रकाशित होतात. याच बरोबरच या वृत्तपत्राची इंटरनेट आवृत्तीही आहे. लोकमत वृत्तपत्र समुहाद्वारे 'लोकमत' हे मराठी 'लोकमत समाचार' हे हिंदी व 'लोकमत टाईम्स' इ. त्रैभाषिक वृत्तपत्रे प्रकाशित केली जातात.

**२. दै. संध्यानंद :**

महाराष्ट्रातील सर्वाधिक मनोरंजन व माहितीचा खजाना असणारे दैनिक म्हणून 'दै. संध्यानंद' ची ख्याती संपूर्ण महाराष्ट्रात आहे. हे दैनिक पुणे येथून दररोज प्रकाशित होत असते. यामध्ये मनोरंजन, वेगवेगळ्या घटनाचे विश्लेषण, गोष्टी सांगणे, चुटकुले, चित्रपट, राशीभविष्य, अध्यात्मिक, प्रेम तिरस्कार, आदीशी संबंधित मजकूर व वैविध्यपूर्ण फोटो याचा समावेश करण्यात येतो. या दैनिकात अभ्यासपूर्ण व मनोरंजनात्मक खजाना वाचकांना सापडतो. कोणत्याही दिवसाचे

वृत्तपत्र चाळले तर त्यात घरातील सर्वांना उपयुक्त असणारी सदरे त्यामध्ये आपणास आढळून येतात. या दैनिकाचे मुख्यालय पुणे येथे असून त्याच्या आवृत्ती मुंबईवरुन सुध्दा निघत असते. दै. संध्यानंद वृत्तपत्र समुहाद्वारे 'लाईफ ३६५' हे इंग्रजी तर 'आज का आनंद' ही वृत्तपत्रे पुण्यातून निघत असतात.

## ४.४ घटकनिहाय विश्लेषण :

मनाला आनंद देणारी घटना, माहिती अथवा सादरीकरण व त्यातून होणारा आनंद हा मनोरंजन या शब्दात सामावलेला आहे. मनोरंजन हा शब्द मन आणि रंजन या शब्दापासून पासून बनलेला आहे. मन या शब्दाच्या अर्थात चित्त, चित्त शक्ती बुध्दी, विचार, तर्क याचे अधिष्ठान म्हणजे मनोरंजन होय.

पत्रकारितेतील उदयास येणाऱ्या नवीन प्रवाहातील मनोरंजन पत्रकारिता एक महत्वाचा भाग म्हणून विकसित होत आहे. यासाठी प्रस्तुत संशोधनामध्ये मनोरंजन पत्रकारितेतील काही घटकांचे आशय विश्लेषण करण्यात आले आहे.

या अभ्यासासाठी निवडलेल्या दै. लोकमत व दै. संध्यानंद या दोन वृत्तपत्राच्या १ जानेवारी २०१४ ते आजपर्यंतच्या अंकाच्या आशय विश्लेषणाद्वारे अभ्यास करण्यात आला आहे. त्यासाठी मुख्य अंकासोबत असणाऱ्या पुरवण्या, यांचासुद्धा अभ्यास करण्यात आला आहे. सर्व अंकाचे मुद्रित क्षेत्र चौ. से.मी. मध्ये मोजून विविध घटकनिहाय विश्लेषण त्यांना मिळालेले स्थान, यावरुन त्याची टक्केवारी काढण्यात आली आहे. दोन्ही वृत्तपत्रातील सामुग्रीचे प्रत्येक घटक निहाय कोष्टक व आलेखाद्वारे त्याची माहिती देण्याचा प्रयत्न केला आहे.

**१. संगीत :**

मानवी जीवनामध्ये संगीताला असाधारण महत्व आहे आणि संगीत ऐकल्यावरच मानवी जीवनाला एक नवीन आकार मिळतो. मानवी मन स्वच्छ ठेवण्यासाठी संगीताचा उपयोग केला जातो. [७]

वर्तमानपत्रांनी मानवी जीवनामध्ये बदल घडवून आणण्यासाठी संगीताशी संबंधित वेगवेगळ्या बातम्यांचा वेध घेतला आहे.

उदा. : १. कानावर गाण्याचे संस्कार (दै. लोकमत, दि. ११ जून २०१५)

२. आनंदी राहण्यासाठी संगीत ऐका (दै. संध्यानंद, दि. २७ जुलै २०१४)

**२. विनोद :**

मानवाच्या जीवनामध्ये हास्य हे अत्यंत महत्वाचे आहे. हस्याशिवाय माणसाचे जगणे कठीण आहे. जीवनात विनोद नसेल तर जगणे अवघड होवून जाते.

विनोद भाषिक, सांकेतिक देहबोलीतून करण्यात येतो आणि तो मानसाचे मनोरंजन करत असतो. दु:खी असणारा माणूससुद्धा विनोदाच्या माध्यमातून आपली सर्व दु:ख विसरुन जातो [८]

हेच वर्तमानपत्राने हेरुन मनोरंजनाचे एक नवे दालन सुरु केले आहे.

उदा. : १. नटखट कन्हैय्या (दै. लोकमत, दि. ७ जुलै २०१५)

२. प्रेमाची जुगलबंदी (दै. संध्यानंद, दि. २९ मार्च २०१५)

**३. कला :**

कोणत्याही देशाची संस्कृती ही धर्म, तत्वज्ञान, साहित्य व कला इत्यादी माध्यमातून अभिव्यक्त होत असते [९] भारतीय संस्कृती टिकऊन ठेऊन तिला

उत्क्रांतीकडे नेण्यामध्ये कलेचे मोठे योगदान राहिलेले आहे. म्हणून मानवीजीवनामध्ये कलेला अनन्यसाधारण महत्व आहे.

वृत्तपत्राच्या माध्यमातून कार्टून चित्र, वेगवेगळे फोटो, कलाकृती या माध्यमातून कलेचे प्रगटीकरण होत असते. या 'कलेचे दर्पण' म्हणजे 'वृत्तपत्र' होत. वृत्तपत्रे मानवाला आनंद देण्यासाठी वेगवेगळ्या कला प्रस्तुत करण्यासाठी माध्यमांचा मोठ्या प्रमाणात वापर करण्यात आला आहे.

उदा. :

**४. खेळ :**

खेळ या संकल्पनेचा उगम हा मानवाच्या उत्क्रांतीच्या प्रक्रियेतलाच एक भाग संरक्षणासारख्या काही गरजेपोटी तर काही सहजपणे होणाऱ्या माणसाच्या शारिरीक हालचालीतून स्वतःचे मनोरंजनही करुन घेण्याची समज माणसाला आली. त्यातच खेळ या संकल्पनेची बीज पेरली गेली. [१०]

खेळाचा जन्म मनोरंजनाचे साधन म्हणून झाला. मनोरंजनासाठी प्राचीन काळापासून तो वापरत आहे तेच साधन वृत्तपत्राने जपून ठेवण्याचे काम केले. दै. लोकमत व संध्यानंद या दैनिकातून देश व विदेशातील अनेक खेळाचे वार्तांकन, बातम्या, विशेष लेख, कधी कधी संपूर्ण पान खेळासाठी देऊन या दोन्ही वृत्तपत्रांनी आपली जवाबदारी पार पाडली आहे.

**५. व्यंगचित्रे / कार्टून :**

वर्तमानपत्रामध्ये साध्या रंग रेषांच्या माध्यमातून तत्कालीन सामाजिक, राजकीय, धार्मिक, आर्थिक, सांस्कृतिक अशा विषयावर गंभीर व विनोदी माध्यमातून

घणाघाती हल्ला केला जातो. प्रत्येक वर्तमानपत्रामध्ये व्यंगचित्रासाठी विशेष दालन दिले जाते. या व्यंगचित्रातून मार्मिकतेने त्या त्या विषयावर व्यंगचित्र काढून तो विषय वाचकांना समजून सांगण्यासाठी व्यंगचित्राचा योजकतेने वापर केला जातो.

‘‘व्यंगचित्रकार हा समाज व्यवस्थेतील व गैरप्रकाराची तक्रार करणारा असतो आयोग्य ते सांगणारा असतो. व्यंग निर्भिडपणे मांडणारा असतो. ढोंग उघडे करणारा असतो.’’ [११]

भारतातील विविध वर्तमानपत्रामध्ये आर.के. नारायण बाळासाहेब ठाकरे, राज ठाकरे यांनी सामान्य वाचकांच्या मनातील समस्या आपल्या व्यंगचित्रातून प्रतिबिंबित करुन एक जागृती करण्याचे काम केले आहे.

**६. गोष्टी सांगणे / बोधकथा सांगणे :**

आपल्याला जरी रात्री झोप येत नसेल तर पूर्वीच्या काळी आजी-आजोबा, आई बाबा हे गोष्टी सांगायचे आणि बोधात्मक व रंजनात्मक गोष्टीतून आपले मनोरंजन व्हायचे.

गोष्टी सांगण्याबद्दल डॉ. वि.ल. धारुरकर म्हणतात की, ‘‘गोष्टी सांगणे ही कला आहे ती लिहिणेसुध्दा कला आहे. ती कशी रंगवून सांगता येईल तेवढ्याच तीव्रतेने त्याचा आविष्कार होऊन मानवी मनाला आनंद देण्याचे काम या गोष्टी करतात.’’ [१२] यावरुन स्पष्ट होते की, मनोरंजनासाठी गोष्टी अत्यंत महत्वाच्या असतात म्हणून वृत्तपत्रांनी सुध्दा मानवाच्या मनोरंजनासाठी बोधकथा, गोष्टी छापणे हे काम अग्रक्रमाने हाती घेतले आहे.

**७. चित्रपट :**

चित्रपट हे लोकभावनांची अभिव्यक्ती करणारे एक जिवंत माध्यम म्हणून ओळखले जाते. माहिती, मनोरंजन आणि प्रबोधन अशा विविध मार्गांनी लोकजीवनाला आकार देण्याचे काम चित्रपट माध्यमाने आरंभापासून यथार्थपणे बजावले आहे.

चित्रपट हे माध्यम समाजजीवनाचा आरसा असतो आणि सामाजिक भाव-भावना व विचारप्रवाह व्यक्त करण्याचे ते एक प्रभावी माध्यम असते. चित्रपटाचा इतिहास पाहता त्याच्या आरंभापासून ते आजतागत या माध्यमांनी बजावलेली सर्व कार्य याच प्रवाहाशी निगडित आहेत.

वर्तमानपत्रेसुध्दा चित्रपटाचे परिक्षण, गॉसिप, समीक्षा, चित्र, वेगवेगळ्या चित्रपटाचे चित्रीकरणाची माहिती नट्याची माहिती देऊन रंजन करण्याचा प्रयत्न करतात.

**८. सर्कस :**

सर्कस हे नाट्यात्मक अभिव्यक्तीचे माध्यम होय. यामध्ये वेगवेगळ्या प्रकारचे प्राणी, जोकर, विदूषक, जादूचे प्रयोग, योगासने व वेगवेगळ्या प्रकारच्या नकला करुन मनोरंजन करण्याचे काम हे सर्कस करीत असतात. [१३]

वर्तमानपत्रामध्ये सर्कसच्या वेगवेगळ्या प्रकारच्या जाहिराती सर्कसमधील अनियमीतता, कलाकाराचे प्रश्न, जनावराचे होणारे हाल याचा लेखाजोखा वर्तमानपत्रातून मांडण्याचा प्रयत्न केला जातो.

## ९. जाहिरात :

जाहिरात ही वर्तमानपत्राचा आरसा असते. वर्तमानपत्रे ही जाहिरातीवर अवलंबून असतात. वर्तमानपत्राचा आर्थिक भार सोसण्याचे काम जाहिरात करते. वर्तमानपत्रामध्ये जेवढ्या जास्त जाहिराती तेवढे ते वर्तमानपत्र श्रीमंत. अशा वृत्तपत्रांचा खप हा अधिक असतो. जाहिरात ही एखाद्या उत्पादनाबाबत वाचकाची मानसिकता बदलून या घटकाबद्दल आतुरता वाढवते. म्हणून वर्तमानपत्रे ही रंगीत आकर्षक मनोरंजनात्मक स्वरुपातून वाचकाच्या मनात घर करतात. याबद्दल कुमुद शर्मा असे म्हणतात की, ‘‘सामाजिक, राजकिय, आर्थिक, मनोरंजनात्मक क्षेत्रात जाहिरातीतील सुचना मधून प्रचार व प्रसाराद्वारे लोक सहमती बनविण्याचे प्रभावी साधन मानल्या जाते. [१४]

जाहिरातीच्या माध्यमातून मनोरंजनात्मक आणि सामाजिक आशय असणाऱ्या अनेक जाहिराती वर्तमानपत्रात सरकारवर अशासकिय व स्वयंसेवी संस्थाही वर्तमानपत्रात जाहिरात देऊन आपली सामाजिक जवाबदारी पार पाडत असतात.

## १०. इतर मनोरंजनात्मक बातम्या :

वर्तमानपत्रामध्ये वेगवेगळ्या प्रकारच्या बातम्या मोठया प्रमाणावर येत असतात. यामध्ये बातमी विशेष बातमी याला वेगळे महत्व दिले जाते परंतु वर्तमानपत्राद्वारे वेगवेगळ्या प्रमाणात बातम्या आढळून येतात. या बातम्या इतर बातम्यात महत्वाचा जरी नसल्यातरी सामान्य वाचकांच्या मनाला रुची असणाऱ्या बातम्या इतर बातम्यात असते. आपल्या परिसरातील घटनांचे चित्रण या इतर बातम्यातून करता येते. याबद्दल या इतर बातम्यांच्या माध्यमातून समाजाच्या इतर घटनांना समसमान न्याय देण्याचे काम वर्तमानपत्र हे करित असते. छोटेखाणी छोटी

बातमी ही प्रत्येकाला आपलेपणाची जाणीव करुन देते. म्हणून वृत्तपत्रात सामान्य लोकांसाठी मनोरंजनात्मक बातम्या देण्यात येतात.

## ४.५ वर्तमानपत्रनिहाय विश्लेषण :

या अभ्यासासाठी निवडलेल्या 'दै. लोकमत' व 'संध्यानंद' या वृत्तपत्राच्या २०१४ व २०१५ मधील निवडक अंकाचा आशय विश्लेषणाद्वारे अभ्यास करण्यात आला. त्यासाठी मुख्य अंकासोबत असणाऱ्या शहर पुरवणीचाही अभ्यास करण्यात आला. सर्व अंकाचे मुद्रित क्षेत्र चौरस सेंटीमीटर मध्ये मोजून मनोरंजनात्मक वार्ताना किती स्थान दिले पुढील तक्त्यांवरुन दिसून येईल.

### ४.५.१ दैनिक लोकमतमधील मनोरंजनात्मक वार्तांचे घटकनिहाय मुद्रित क्षेत्रफळ व टक्केवारी

| अ.क्र. | बातम्यांचे घटक | मुद्रित क्षेत्र (चौ.से.मी.) | टक्केवारी (%) |
|---|---|---|---|
| 1. | संगीत | 3716.75 | 13.78 |
| 2. | विनोद | 682.5 | 2.53 |
| 3. | कला | 5313.25 | 19.70 |
| 4. | खेळ | 3034.5 | 11.25 |
| 5. | कार्टून | 893.7 | 3.31 |
| 6. | गोष्टी सांगणे (कथा) | 567.25 | 2.10 |
| 7. | चित्रपट | 1537.55 | 5.70 |
| 8. | सर्कस | 340.35 | 1.26 |
| 9. | जाहिरात (मनोरंजनात्मक) | 3928.35 | 14.56 |
| 10. | इतर मनोरंजनात्मक | 4111.5 | 15.24 |
| | **एकुण :** | **24125.70** | **100** |

## दैनिक लोकमत

| दिनांक | बातमीचे शीर्षक | बातमीचे प्रकार | मुद्रित क्षेत्र | एकुण मु.क्षे. |
|---|---|---|---|---|
| 19.06.2015 | मनोरंजन जाहिरात | मनोरंजन जाहिरात | 25 x 32.5 | 812.5 |
| 26.07.2015 | चित्रपट जाहिरात | चित्रपट प्रदर्शित जाहिरात | 25 x 32.5 | 812.5 |
| 02.08.2015 | चित्रपट जाहिरात | नव्या चित्रपट प्रदर्शित | 15.5 x 16.7 | 258.85 |
| 18.06.2015 | संस्काराचे मोती | | 25 x 16 | 400 |
| 27.06.2015 | माझा बदला दिसेल पण मी नाही | नविन चित्रपट रिलीज | 19.5 x 16 | 312 |
| 06.07.2015 | वेलकम बॅक | नविन चित्रपट रिलीज | 24.5 x 16 | 392 |
| 18.06.2015 | बजरंगी भाईजान | नविन चित्रपट रिलीज | 24.5 x 16 | 392 |
| 27.06.2015 | प्रेम सुंदर आहे, परंतु सूड नाही | नविन चित्रपट रिलीज | 24.5 x 16 | 392 |
| 19.06.2015 | चांदोबा चांदोबा भागलास का | संस्काराचे मोती बालकांसाठी | 16 x 25 | 400 |
| 14.06.2015 | कॅसिनो प्राईड | खेळण्यासाठी उपलब्ध | 14.5 x 12 | 174 |
| | | **एकूण :** | | **3928.35** |

| दिनांक | बातमीचे शीर्षक | बातमीचे प्रकार | मुद्रित क्षेत्र | एकुण मु.क्षे. |
|---|---|---|---|---|
| 15.06.2015 | चित्रपट सृष्टीच्या भगवीकरणाचा डाव | चित्रपट | 10 x 12 | 120 |
| 10.06.2015 | शाहरुख खान-भन्साळी डिसेंबरमध्ये होणार व्यावसायिक संघर्ष | चित्रपट | 9 x 12 | 108 |
| 08.06.2015 | न्या. कोदे आता निवृत्तीनंतर रुपेरी पडद्यावर न्यायाधीश ! | चित्रपट | 5.8 x 16 | 92.8 |
| 08.07.2015 | शाहिद - मीरा विवाहबद्ध | चित्रपट | 10.5 x 15.5 | 162.75 |
| 06.05.2015 | मल्टिप्लेक्सच्या उत्पन्नात मराठी निर्मात्यांचा वाटझिं | चित्रपट | 8.5 x 9 | 76.5 |
| 04.05.2015 | राष्ट्रीय चित्रपट पुरस्कारांचे थाटात वितरण | चित्रपट | 6 x 16 | 96 |
| 24.06.2015 | आता टि.व्ही. वाहिन्या बदलणे मन की बात | चित्रपट | 11.5 x 8 | 92 |
| 02.06.2015 | प्रभात पुरस्कारांवर एक हाजाराची नोट या मोहोर | चित्रपट | 11 x 32 | 352 |
| 04.05.2015 | राष्ट्रीय चित्रपट पुरस्कार वितरण सोहळा थाटात | चित्रपट | 10 x 17.5 | 175 |
| 10.07.2015 | तर बजरंग भाईजान सरहद्दही पार करेल. | चित्रपट | 17.5 x 15 | 262.5 |
| | | **एकूण :** | | **1537.55** |

| दिनांक | बातमीचे शीर्षक | बातमीचे प्रकार | मुद्रित क्षेत्र | एकुण मु.क्षे. |
|---|---|---|---|---|
| 09.08.2015 | लोकनृत्याने फेडले डोळ्याचे पारणे | कला | 12.8 x 15 | 192 |
| 08.08.2015 | चित्र-शिल्प कलेला राजाश्रय देऊ | कला | 19.5 x 12.5 | 243.75 |
| 08.07.2015 | हटके हिरोज | कला | 17 x 13 | 221 |
| 03.07.2015 | थ्रीडी ॲनिमेशन | कला | 9.5 x 11 | 104.5 |
| 04.07.2015 | कथक नृत्य | कला | 12 x 8 | 96 |
| 24.06.2015 | पी.के. ए कॉपी कैट | कला | 16 x 11 | 176 |
| 09.07.2015 | कॉड कॉप्टर प्रात्यक्षिकांनी विद्यार्थी चर्कि[illegible] | कला | 23.5 x 32 | 752 |
| 18.06.2015 | आय.आय.एफ.ए. रॉक्स - 2015 | कला | 32 x 52 | 1664 |
| 05.07.2015 | आयफा ॲवॉर्डस 2015 | कला | 32 x 52 | 1664 |
| 09.06.2015 | दिल धडकने दो ची बॉक्स ऑफिक्सवरील धडकन मंदावली | कला | 10 x 20 | 200 |
| | | **एकूण :** | | **5313.25** |

| दिनांक | बातमीचे शीर्षक | बातमीचे प्रकार | मुद्रित क्षेत्र | एकुण मु.क्षे. |
|---|---|---|---|---|
| 12.08.2015 | मराठी रंगभूमीच्या विलक्षण साक्षीदाराचे निर्वाण | इतर मनोरंजनात्मक नाट्य | 14.5 x 24 | 348 |
| 09.07.2015 | नाट्यगृह उभारणीसाठी केली जागेची पाहणी | इतर मनोरंजनात्मक नाट्य | 7.5 x 16 | 120 |
| 27.05.2015 | प्रभात पुरस्काराची ऑनलाईन घोषणा | पुरस्कार | 9.5 x 20.5 | 194.75 |
| 13.07.2015 | चक्रव्युहात धर्मराज | वाचक पत्रे | 14.5 x 11.5 | 166.75 |
| 11.07.2015 | आ गया है भाईजान! | मुलाखत | 25.5 x 32 | 816 |
| 14.06.2015 | तरल नात्यांचा भावविश्वाचा वेध ! | नाट्य परिक्षण | 19.5 x 16 | 312 |
| 14.06.2015 | नातेसंबंधाच्या सर्व रंग छटांचे कोंदण - हंमारी अधूरी कहाणी | चित्रपट स्पर्धा | 24.5 x 20 | 490 |
| 10.07.2015 | करोगे याद तो | व्यक्तिविशेष | 32 x 52 | 1664 |
| | | **एकूण :** | | **4111.05** |

| दिनांक | बातमीचे शीर्षक | बातमीचे प्रकार | मुद्रित क्षेत्र | एकुण मु.क्षे. |
|---|---|---|---|---|
| 10.08.2015 | टोलेबाजी | कार्टून | 7.5 x 3.5 | 26.25 |
| 08.07.2015 | टोलेबाजी | कार्टून | 7 x 3.5 | 24.5 |
| 05.07.2015 | टोलेबाजी | कार्टून | 5.7 x 3.5 | 19.95 |
| 25.06.2015 | टोलेबाजी | कार्टून | 8 x 3.5 | 28 |
| 07.07.2015 | गुरुंजीच्या हाती खडू नव्हे तर खोरे | कार्टून | 21 x 21 | 441 |
| 08.07.2015 | जराशी गंमत | कार्टून | 8.5 x 4 | 34 |
| 13.07.2015 | जराशी गंमत | कार्टून | 8.5 x 4 | 34 |
| 08.06.2015 | सुट्टी रे सुट्टी | कार्टून | 14.5 x 15.5 | 224.75 |
| 12.07.2015 | संगणक बंद | कार्टून | 9.5 x 3.5 | 33.25 |
| 01.07.2015 | टोलेबाजी | कार्टून | 8 x 3.5 | 28 |
| | | **एकूण :** | | **893.07** |

| **दिनांक** | **बातमीचे शीर्षक** | **बातमीचे प्रकार** | **मुद्रित क्षेत्र** | **एकुण मु.क्षे.** |
|---|---|---|---|---|
| 30.06.2014 | जादूई कला ही मेहनतीनेच मिळते. | सर्कस | 15 x 13 | 195 |
| 28.04.2014 | लोककलेंचा जादूगार | कार्टून | 15.3 x 9.5 | 145.35 |
| | | | **एकूण :** | **340.35** |

| **दिनांक** | **बातमीचे शीर्षक** | **बातमीचे प्रकार** | **मुद्रित क्षेत्र** | **एकुण मु.क्षे.** |
|---|---|---|---|---|
| 28.04.2014 | कंजूसपणाचा रुबाब | बालकथा (मनोरंजन) | 9 x 14.5 | 130.5 |
| 22.07.2014 | टपालाच्या तिकिटाची कहाणी | बालकथा (मनोरंजन) | 10 x 12 | 120 |
| 02.07.2014 | सर्वांशी गोड बोलावे | बालकथा (मनोरंजन) | 11.5 x 13.5 | 155.25 |
| 01.04.2014 | एक ग्लास दुधाची परतफेड | कार्टून | 9.5 x 17 | 161.5 |
| | | **एकूण :** | | **567.25** |

| दिनांक | बातमीचे शीर्षक | बातमीचे प्रकार | मुद्रित क्षेत्र | एकुण मु.क्षे. |
|---|---|---|---|---|
| 31.07.2015 | हॉस्टेलवारी यारी | संगीत | 29 x 25 | 725 |
| 11.06.2015 | कानावर गाण्याचे संस्कार | संगीत | 18.5 x 19 | 351.5 |
| 01.02.2015 | फडावरची ये-जा | संगीत | 29 x 52 | 1508 |
| 07.06.2015 | कार्निव्हल इन व्हेनिस | संगीत | 29 x 18 | 522 |
| 10.08.2015 | नार नखरेवाली | संगीत | 8 x 8 | 64 |
| 13.06.2015 | विविध नृत्यप्रकारांचा मागोवा | संगीत | 9.5 x 20 | 190 |
| 14.06.2015 | नाथराव नेरळकर यांना संगीत अकादमी पुरस्कार | पुरस्कार | 10 x 16 | 160 |
| 27.06.2015 | सा.रे.ग.म. | पुरस्कार | 12.5 x 7.5 | 93.75 |
| 07.06.2015 | लयभारी आमची लावणी | पुरस्कार | 5 x 8 | 40 csm |
| 22.07.2015 | चंद्रभागेतीरी होणार फक्त भजन, कीर्तन | पुरस्कार | 14 x 4.5 | 63 |
| **एकूण :** | | | | **3716.75** |

| दिनांक | बातमीचे शीर्षक | बातमीचे प्रकार | मुद्रित क्षेत्र | एकुण मु.क्षे. |
|---|---|---|---|---|
| 13.07.2015 | भारताने मालिका जिंकली | खेळ (क्रिकेट) | 21 x 21 | 441 |
| 13.07.2015 | विम्बल्डन चॅम्पियन होणे ही विलक्षण अनुभूती | टेनिस | 25 x 22 | 550 |
| 10.07.2015 | भारत-झिम्बाब्वे लढत आज | क्रिकेट | 20.5 x 18.5 | 379.25 |
| 10.07.2015 | तो पर्यंत राष्ट्रीय स्पर्धा खेळणार नाही | स्क्वॅश | 15.5 x 10 | 155 |
| 12.07.2015 | मालिका विजयाचा इरादा | क्रिकेट | 21 x 20.5 | 430.5 |
| 07.07.2015 | सेरेना, शारापोव्हा क्वार्टर फायनलमध्ये | बॅडमिंटन | 16.5 x 16.5 | 272.25 |
| 07.07.2015 | धोनीचा सल्ला सकारात्मक घेणार | क्रिकेट | 21.5 x 12.5 | 268.75 |
| 07.07.2015 | मितालीच्या नेतृत्वाखाली भारताचा शानदार विजय | महिला क्रिकेट | 20 x 7.5 | 150 |
| 08.06.2015 | आशियाई स्पर्धेत सिद्धांत मोरेला रौप्य | शरीर सौष्ठव | 11.5 x 16.5 | 189.75 |
| 08.06.2015 | टिंटू लुकाला सुवर्णपदक | ॲथलेटिक्स | 12 x 16.5 | 198 |
| | | **एकूण :** | | **3034.05** |

| दिनांक | बातमीचे शीर्षक | बातमीचे प्रकार | मुद्रित क्षेत्र | एकुण मु.क्षे. |
|---|---|---|---|---|
| 07.07.2015 | नटखट कन्हैय्या | बाल विनोद | 10 x 4.5 | 45 |
| 01.02.2015 | वीरश्री | बाल विनोद | 10.5 x 4.5 | 47.25 |
| 04.06.2015 | स्वीट फ्रुट | बाल विनोद | 10 x 4.5 | 45 |
| 08.03.2015 | छोटासा रंगारी | बाल विनोद | 10 x 4.5 | 45 |
| 10.01.2015 | हटके दोस्त | बाल विनोद | 13.5 x 16 | 216 |
| 12.05.2015 | शंभो शंकरा | बाल विनोद | 11.5 x 4.5 | 51.75 |
| 05.04.2015 | वाट बघतोय रिक्षावाला | बाल विनोद | 4 x 9 | 36 |
| 15.06.2015 | छोटेसे गांधीजी | बाल विनोद | 7.5 x 8 | 60 |
| 03.08.2015 | राधा कन्हैय्या | बाल विनोद | 6.5 x 8 | 52 |
| 10.11.2015 | सॉनिक डॅश | बाल विनोद | 6.5 x 13 | 84.5 |
| | | **एकूण :** | | **682.5** |

.

| दिनांक | बातमीचे शीर्षक | बातमीचे प्रकार | मुद्रित क्षेत्र | एकुण मु.क्षे. |
|---|---|---|---|---|
| 28.03.2014 | समाजप्रबोधनाचा आदर्श -सत्यमेव जयते | इतर मनोरंजनात्मक (वाचकांची पत्रे) | 9.5 x 9.5 | 90.25 |
| 21.06.2014 | श्री योगीद्वारे रुपेरी पडद्यावर | व्यक्तिविशेष जीवनचरित्र कथा | 23 x 20 | 460 |
| 09.04.2014 | बॉलिवुडचा जग्गूदादा जॉकी श्रॉफ | व्यक्तिविशेष मुलाखत | 17 x 15.5 | 263.5 |
| 13.06.2014 | सुपरहिट सिनेमे | नवीन तंत्रज्ञानावर आधारीत चित्रपट | 16 x 15 | 240 |
| 04.04.2014 | सनी लिओन मराठी चित्रपटात | नवीन तंत्रज्ञान आधारीत चित्रपट | 9.5 x 4.5 | 42.75 |
| | | **एकूण :** | | **1096.5** |

.

**दै. लोकमत**

**1)** एकुण अंक = 18 महिने

**2)** 18 महिन्यांचे एकुण मु.क्षे. = 26964 चौ.से.मी.

**3)** जाहिरातीचे क्षेत्र 10 % = 2696 चौ.से.मी.

**4)** मजकूर व वार्तासाठीचे मु.क्षे. = 24125.70 चौ.से.मी.

**5)** टक्केवारी = 90 %

यावरुन असे स्पष्ट होते की, दै. लोकमत व दै. संध्यानंद ने विविध विषय व क्षेत्रातील विभागणीनूसार संगीत, विनोद, कला, चित्रपट, सर्कस, कार्टून, खेळ, जाहिरात, गोष्टी सांगणे व इतर मनोरंजनात्मक या घटकांचा समावेश होतो.

1 जानेवारी 2014 ते आजपर्यंतच्या दै. लोकमत व दै. संध्यानंद या वृत्तपत्राने मनोरंजनात्मक बातम्यांमध्ये संगीत या घटकाला लोकमतने 3716.75 चौ.से.मी. एवढा जागा व 13.78% एवढे स्थान म्हणजेच 2.53 % एवढे स्थान दिलेले आहे. तसेच कला या घटकाला 5313.25 चौ. से.मी. म्हणजेच 19.70% एवढे स्थान दिलेले आहे. नंतर खेळ या घटकाला 3034.5 चौ.से.मी. म्हणजेच 11.25 % एवढी जागा दिलेली आहे. तसेच कार्टून या घटकाला 893.7 चौ.से.मी. म्हणजेच 3.31% एवढे स्थान दिले आहे कथा किंवा गोष्टी सांगणे या घटकाला 567.25 चौ.से.मी. म्हणजेच 2.10 % एवढी जागा दिल्याचे स्पष्ट होते.

चित्रपट या मनोरंजनात्मक घटकाला दै. लोकमतने 1537.55 चौ.से.मी. म्हणजेच 5.70% एवढी जागा दिली आहे. तसेच सर्कस या घटकाला 340.25 चौ.से.मी. म्हणजेच 1.26 % एवढी जागा दिल्याचे स्पष्ट होते. तर जाहिरातीला 3928.35 चौ.से.मी. म्हणजेच 14.56% एवढी जागा दिली आहे. तसेच इतर मनोरंजनात्मक घटकाला 4111.5 चौ.से.मी. म्हणजेच 15.24 % एवढी जागा दै. लोकमतने मनोरंजनात्मक बातम्यांना दिल्याचे स्पष्ट होते.

**४.५.२ दै. संध्यानंद मधील मनोरंजनात्मक वार्तांचे घटकनिहाय मुद्रित क्षेत्रफळ व टक्केवारी**

| अ.क्र. | बातम्यांचे घटक | मुद्रीत क्षेत्र (चौ.से.मी.) | टक्केवारी |
|---|---|---|---|
| 1 | संगीत | 1744.45 | 6.46 |
| 2 | विनोद | 2065.05 | 7.65 |
| 3 | कला | 2489.25 | 9.23 |
| 4 | खेळ | 2001.35 | 7.42 |
| 5 | कार्टून | 1665.95 | 6.17 |
| 6 | कथा (गोष्टी सांगणे) | 1877.83 | 6.96 |
| 7 | चित्रपट | 3127.35 | 11.59 |
| 8 | सर्कस | 587.85 | 20.18 |
| 9 | मनोरंजनात्मक जाहिरात | 1766.65 | 6.55 |
| 10 | इतर मनोरंजनात्मक | 1096.5 | 4.06 |
| | एकुण : | 18422.23 | 100% |

## दै. संध्यानंद

| दिनांक | बातमीचे शीर्षक | बातमीचे प्रकार | मुद्रित क्षेत्र | एकुण मु.क्षे. |
|---|---|---|---|---|
| 29.03.2015 | डोक्याला शॉट | विनोद | 11 x 7.5 | 82.5csm |
| 29.03.2015 | प्रेमाची जुगलबंदी | विनोद | 8 x 11.5 | 92 |
| 19.06.2015 | है कोई जवाब ? | विनोद | 17.5 x 6.5 | 113.75 |
| 12.06.2014 | ब्युटी ॲन्ड द बीस्ट | विनोद | 13.5 x 14 | 189 |
| 24.07.2014 | केवढा हा विनोद | विनोदात्मक | 24.5 x 6.5 | 159.25 |
| 16.07.2014 | आलियाची हुशारी | विनोदात्मक | 24.7 x 12.5 | 308.75 csm |
| 19.05.2014 | झीक्यू भारतात आणणार दोन आंतरराष्ट्रीय शो | विनोदात्मक | 10.5 x 15 | 157.5 |
| 24.06.2014 | पाकिस्तानी विनोद | विनोदात्मक | 18.5 x 15 | 277.5 Csm |
| 15.05.2014 | आलिया भोगासी असावे सादर | विनोदात्मक | 19.2 x 19 | 364.8 |
| 11.06.2014 | सार्थक झाले जन्माचे | विनोदात्मक | 16 x 20 | 320 |
| | | | **एकूण :** | **2065.05** |

| दिनांक | बातमीचे शीर्षक | बातमीचे प्रकार | मुद्रित क्षेत्र | एकुण मु.क्षे. |
|---|---|---|---|---|
| 27.07.2014 | आनंदी राहण्यासाठी संगीत ऐका | संगीत | 14 x 11.5 | 161 csm |
| 27.09.2014 | लोकप्रिय म्युझिक थेरपी ! | संगीत | 16.5 x 12.5 | 206.25 csm |
| 06.04.2014 | संगीताची ताकद आजमवण्यासाठी | संगीत | 4 x 15 | 60 |
| 09.07.2014 | संगीत सुरातून मनशांतीची प्राप्ती होते | संगीत | 13 x 19.5 | 253.5 |
| 12.06.2014 | मुलांना म्युजिक शिकवा आणि टॅक्समध्ये सूट मिळवा. | संगीत | 14 x 9.3 | 130.2 |
| 09.04.2015 | जीवनामध्ये संगीताचे स्थान महत्वाचे | संगीत | 13 x 15 | 195 |
| 28.04.2015 | संगीत आणि नशा | संगीत | 16.5 x 12.5 | 206.25 |
| 04.07.2014 | चिपांझींना भारतीय संगीत सर्वात जास्त आवडतं | संगीत | 8.5 x 18.5 | 157.25 |
| 30.06.2014 | वो भूली दास्ताँ मैफलीस रसिकांची दाद | संगीत | 11 x 15 | 165 csm |
| 21.06.2014 | उत्कृष्ट संगीत निर्मितीसाठी नवीन टेक्निक | संगीत | 14 x 15 | 210 |
| | | | **एकूण :** | **1744.45** |

| दिनांक | बातमीचे शीर्षक | बातमीचे प्रकार | मुद्रित क्षेत्र | एकुण मु.क्षे. |
|---|---|---|---|---|
| 01.04.2014 | अफलातून कार्टून | कार्टून | 17.5 x 6.5 | 113.75 |
| 14.06.2014 | अफलातून कार्टून | कार्टून | 10 x 19 | 190 |
| 22.07.2014 | अफलातून कार्टून | कार्टून | 17.5 x 7.5 | 131.25 |
| 29.09.2014 | अफलातून कार्टून | कार्टून | 15.5 x 11 | 170.5 |
| 02.04.2014 | अफलातून कार्टून | कार्टून | 15.7 x 11.5 | 180.55 |
| 30.06.2014 | अफलातून कार्टून | कार्टून | 7.5 x 20 | 150 |
| 24.07.2014 | अफलातून कार्टून | कार्टून | 10 x 18.3 | 183 |
| 15.04.2014 | अफलातून कार्टून | व्यंगचित्र कार्टून | 9.5 x 19 | 180.5 |
| 20.04.2014 | अफलातून कार्टून | कार्टून | 17.2 x 9.5 | 163.4 |
| 09.04.2014 | अफलातून कार्टून | कार्टून | 14 x 14.5 | 203 |
| | | | **एकूण :** | **1665.95** |

| दिनांक | बातमीचे शीर्षक | बातमीचे प्रकार | मुद्रित क्षेत्र | एकुण मु.क्षे. |
|---|---|---|---|---|
| 16.03.2015 | वाईटांची संगत करणे बरे नव्हे | बालकथा गोष्टी सांगणे | 9.2 x 14.5 | 133.4 |
| 11.04.2015 | कावळ्याने पळविली म्हातारीची भाकरी | बालकथा गोष्टी सांगणे | 11 x 19.5 | 214.5 |
| 28.06.2014 | चतूरपणामुळे रामलालची गाय परत मिळाली | बालकथा गोष्टी सांगणे | 10.3 x 20 | 206 |
| 27.04.2015 | लबाड व लोभी सोहन लोभापायी नदीत बुडाला | बालकथा गोष्टी सांगणे | 10.8 x 19.3 | 208.44 |
| 27.07.2014 | खरा गुन्हेगार कोण ? | बालकथा गोष्टी सांगणे | 18.8 x 9.8 | 184.24 |
| 14.06.2014 | विश्वासू मंत्र्याचे दिवस फिरले | बालकथा गोष्टी सांगणे | 14.5 x 16.5 | 239.25 |
| 01.04.2014 | ससा आणि कासवाची शर्यत | बालकथा गोष्टी सांगणे | 12 x 15.5 | 186 |
| 11.05.2015 | सल्ला मसलतीने निर्णय घेणेच फायद्याचे असते. | बालकथा गोष्टी सांगणे | 10 x 19.5 | 195 |
| 18.06.2015 | सुर्याचा पहिला किरण | बालकथा गोष्टी सांगणे | 11 x 11 | 121 |
| 18.06.2014 | डाकू आणि भूकेला सिंह | बालकथा गोष्टी सांगणे | 10 x 19 | 190 |
| | | | **एकूण :** | **1877.83** |

| दिनांक | बातमीचे शीर्षक | बातमीचे प्रकार | मुद्रित क्षेत्र | एकुण मु.क्षे. |
|---|---|---|---|---|
| 27.07.2014 | दोरीवरच्या उड्या मारा, चुस्त रहा ! | खेळ | 11.5 x 17.5 | 201.25 |
| 24.06.2014 | कावळ्याने पळविली म्हातारीची भाकरी | खेळ | 47.5 x 9 | 427.5 |
| 12.06.2014 | चतूरपणामुळे रामलालची गाय परत मिळाली | खेळ | 17.5 x 9.5 | 166.25 |
| 12.07.2014 | लबाड व लोभी सोहन लोभापायी नदीत बुडाला | खेळ (फुटबॉल) | 13.5 x 18 | 243 |
| 24.06.2014 | खरा गुन्हेगार कोण ? | खेळ (फुटबॉल) | 9 x 19 | 171 |
| 18.05.2014 | विश्वासू मंत्र्याचे दिवस फिरले | खेळ | 10.5 x 30 | 315 csm |
| 26.06.2014 | ससा आणि कासवाची शर्यत | खेळ | 12 x 15.5 | 186 |
| 14.06.2014 | सल्ला मसलतीने निर्णय घेणेच फायद्याचे असते. | खेळ | 10 x 19.5 | 195 |
| 20.05.2014 | सुर्याचा पहिला किरण | खेळ | 11 x 11 | 121 |
| 07.04.2014 | डाकू आणि भूकेला सिंह | खेळ | 10 x 19 | 190 |
| | | | **एकूण :** | **1877.83** |

.

| दिनांक | बातमीचे शीर्षक | बातमीचे प्रकार | मुद्रित क्षेत्र | एकुण मु.क्षे. |
|---|---|---|---|---|
| 27.07.2014 | दोरीवरच्या उड्या मारा, चुस्त रहा ! | खेळ | 11.5 x 17.5 | 201.25 |
| 24.06.2014 | अनोख्या परंपरा आणि अजब खेळ | खेळ | 47.5 x 9 | 427.5 |
| 12.06.2014 | मुलांना खेळण्याद्वारे अनेक प्रकारचे शिक्षण मिळत असते. | खेळ | 17.5 x 9.5 | 166.25 |
| 12.07.2014 | ये क्या हुआ, कैसे हुआ | खेळ (फुटबॉल) | 13.5 x 18 | 243 |
| 24.06.2014 | रक्तबंबाळ फुटबॉल योद्धा ! | खेळ (फुटबॉल) | 9 x 19 | 171 |
| 18.05.2014 | उन्हाळ्यातील सुट्टीसाठी छान छान खेळ | खेळ | 10.5 x 30 | 315 csm |
| 26.06.2014 | सिनेमा एक खेळ | खेळ | 8 x 19 | 152 |
| 14.06.2014 | नाचबलीयें खेल खेल में | खेळ | 6.3 x 14.5 | 91.35 |
| 20.05.2014 | खेळ जिद्दीचा | खेळ | 12 x 9 | 108 |
| 07.04.2014 | बाकरवाडी मी खेळीची | खेळ | 14 x 9 | 126 |
| | | | **एकूण :** | **2001.35** |

| दिनांक | बातमीचे शीर्षक | बातमीचे प्रकार | मुद्रित क्षेत्र | एकुण मु.क्षे. |
|---|---|---|---|---|
| 07.07.2014 | स्क्रॅपपासून कलाकृती | कला | 11 x 14.3 | 157.3 |
| 14.06.2014 | मधमाश्यांना गंध घेण्याची कला शिकवणार | कला | 12 x 15 | 180 |
| 26.04.2015 | अभिनय क्षेत्र, एक ग्लॅमरस करिअर | कला | 14.5 x 20 | 290 |
| 29.09.2014 | भयकारी कला | चित्रकला | 19 x 19 | 361 |
| 09.05.2015 | उत्तम संभाषण कला आत्मसात करा | संभाषण कला | 9 x 14.5 | 130.5 |
| 05.07.2014 | एक व्हिलन एक ॲक्टर | अभिनय | 14.8 x 16.5 | 244.2 |
| 15.04.2014 | इंडिया डान्सिंग ! इंडिया शायनिंग ! | डान्स कला | 15 x 30 | 450 csm |
| 06.07.2014 | बोल कालिया मंदी क्यू है | डायलॉग | 6.5 x 9.5 | 61.75 csm |
| 09.07.2014 | नृत्य हाही एक व्यवसाय | डान्स | 11.5 x 13 | 149.5 |
| 22.01.2015 | मुंबईच्या पथनाट्यांन उत्तर भारतात प्रबोधन घडवलं | पथनाटय | 15.5 x 30 | 465 |
| | | | **एकूण :** | **2489.25** |

| दिनांक | बातमीचे शीर्षक | बातमीचे प्रकार | मुद्रित क्षेत्र | एकुण मु.क्षे. |
|---|---|---|---|---|
| 29.06.2014 | रिॲलिटी शोच्या ट्रेनिंग क्लासेसची गर्दी वाढली | चित्रपट | 12.5 x 17.5 | 218.75 |
| 17.07.2015 | बॅलिवूडच्या नायिकांनाही आता कोटीमध्ये मोबदला मिळू लागला आहे. | चित्रपट | 15.5 x 30 | 465 csm |
| 24.03.2014 | मालिकांच्या जगातही होऊ दे खर्च ! | चित्रपट | 27.5 x 9.5 | 261.25 |
| 23.03.2014 | मातब्बर कलाकारांचा चित्रपट तप्तपदी 28 मार्च पासून | चित्रपट | 14.5 x 23.3 | 337.85 |
| 21.06.2014 | चित्रपट व्यवसायात आहेत करिअरच्या उत्तम संधी | चित्रपट | 22 x 12 | 264 |
| 21.03.2014 | कोट्यावधी रुपयांची कमाई ही बॉलिवूडची जूनी परंपरा | चित्रपट | 20 x 29.5 | 590 |
| 28.06.2014 | छोटा पडदा झाला मोठा | चित्रपट | 14.5 x 29 | 420.5 |
| 06.04.2014 | सामाजिक संदेश आणि कमरणूक यांचा उत्तम मेळ आवश्य पहावा असा चित्रपट | चित्रपट परिक्षण | 10.5 x 29 | 304.5 |
| 28.03.2015 | संगीताच्या सुरावटींनी संपन्न करिअर व्हिडीओ जॉकी | चित्रपट | 21.5 x 9 | 103.5 |
| 22.05.2014 | सिनेमे छोटे, नुकसान मोठे | चित्रपट | 12 x 6 | 72 |
| | | | **एकूण :** | **3127.35** |

| दिनांक | बातमीचे शीर्षक | बातमीचे प्रकार | मुद्रित क्षेत्र | एकुण मु.क्षे. |
|---|---|---|---|---|
| 28.04.2015 | फुग्यांचा जादूगार | सर्कस | 15.3 x 9.5 | 145.35 |
| 30.06.2014 | जादूगार होण्यासाठी ही मेहनत लागते | सर्कस | 15 x 13 | 195 |
| 24.03.2014 | क्षण एक पूरे गमतीचा | सर्कस | 19.5 x 10 | 195 |
| 23.03.2014 | गंमतीच्या गोष्टी (जादूई) | सर्कस | 7 x 7.5 | 52.5 |
| | | | **एकूण :** | **587.85** |

| दिनांक | बातमीचे शीर्षक | बातमीचे प्रकार | मुद्रित क्षेत्र | एकुण मु.क्षे. |
|---|---|---|---|---|
| 24.05.2014 | उद्या ऑडिशन्स मुंबईमध्ये | मनोरंजन जाहिरात | 19.5 x 12 | 234 |
| 15.05.2014 | जबरदस्त जाहिरात | चित्रपट डायलॉग | 8 x 20 | 160 |
| 16.04.2014 | टी.व्ही.मुळे मुलांना होऊ शकते कॅन्सर सारखी बिमारी | चित्रपट डायलॉग | 19 x 10 | 190 |
| 10.05.2014 | मनोरंजन क्षेत्रातील उलाढाल | चित्रपट डायलॉग | 15.5 x 6.3 | 97.65 |
| 07.04.2014 | व्यसन टी.व्ही चे कमी करा | चित्रपट डायलॉग | 15.5 x 15 | 232.5 |
| 11.04.2014 | टी.व्ही.मालिकामुळे वाढतोय व्याभिचार | चित्रपट डायलॉग | 10 x 15 | 150 |
| 02.07.2014 | जबरदस्त जाहिरात | सिनेमा पोस्टर | 15 x 9.5 | 142.5 |
| 28.06.2014 | जबरदस्त जाहिरात | चित्रपट प्रदर्शित | 18 x 10 | 180 |
| 01.05.2014 | टी.व्ही. पहा सुरक्षित | चित्रपट प्रदर्शित | 12.5 x 18 | 225 |
| 11.06.2014 | टायगरची हीरोइन पंती | चित्रपट म्यूझिक | 15.5 x 10 | 155 |
| | | | **एकूण :** | **1766.65** |

**दै. संध्यानंद**

| | |
|---|---|
| **1)** एकुण अंक | = 18 महिने - 547 |
| **2)** 18 महिने 547 अंकाचे मु.क्षे. | = 26964 चौ.से.मी. |
| **3)** जाहिरातीचे एकूण क्षेत्र 10 % | = 2696 चौ.से.मी. |
| **4)** मजकूर व वार्तासाठीचे मु.क्षे. | = 18422 चौ.से.मी. |
| **5)** टक्केवारी | = 70 % |

यावरुन असे स्पष्ट होते की, दै. लोकमत व दै. संध्यानंद या दोन्ही वृत्तपत्राने मनोरंजनात्मक बातम्यांना महत्वपूर्ण स्थान दिलेले आहे.

दै. संध्यानंद या वृत्तपत्राने मनोरंजनात्मक बातम्यांमधील संगीत, कला, सर्कस, बालकथा, चित्रपट, जाहिरात, कार्टून इतर मनोरंजनात्मक खेळ, विनोद या घटकांना महत्वाचे स्थान दिलेले आहे.

दै. संध्यानंद संगीत या घटकाला 1744.45 चौ.से.मी. म्हणजेच 6.46 % एवढे स्थान दिलेले आहे. तसेच विनोद या घटकाला 2065.05 चौ. से.मी. म्हणजेच 7.65% एवढे स्थान दिलेले आहे. तर कला या घटकाला 2489.25 म्हणजेच 9.23 % एवढे स्थान दिल्याचे स्पष्ट होते. तसेच खेळ या घटकाला 2001.35 चौ.से.मी. म्हणजेच 7.42% एवढी जागा दिली आहे. तसेच कार्टून या घटकाला 1665.95 चौ.से.मी. म्हणजेच 6.17 % एवढी तर कथा या घटकाला 1877.83 चौ.से.मी. 6.96% एवढी जागा दिलेले स्पष्ट होते. तसेच चित्रपट या घटकाला 3127.35 चौ.से.मी. म्हणजेच 11.59 % एवढी जागा दिल्याचे स्पष्ट होते. तसेच सर्कस या घटकाला 587.85 चौ.से.मी. म्हणजेच 2.18 % एवढी जागा दिली आहे. मनोरंजनात्मक जाहिरात या घटकाला 1096.5 चौ.से.मी. म्हणजेच 04.06 % एवढी जागा दिल्याचे स्पष्ट होते.

**४.५.३ दै.लोकमत व दै. सध्यानंद मधील मनोरंजनात्मक वार्तांचा घटकनिहाय मुद्रित क्षेत्रफळ व टक्केवारी दर्शवणारा तुलनात्मक आलेख**



**संदर्भ सुची :**


१. Young P.V. Scientific Social Surveys & Research, Prentic Hall of India Pvt. Ltd., New Delhi, 1973, P. 30.

२. Kerlinger, F.N. Foundation of Behavioural Research, Holt Rine Heart & Winston, New York, 1973, P. 34

३. Young P.V. Opcit, P. 34

४. Berger A.A., Media Analisis Technique, Sage, New York, P. 189.

५. Sharma S.C. & Bakshi Shweta Modernm Journalism & Mass Communication, A.K. Publisher, New Delhi 2009, P. 13.

६. डॉ. भांडाकर पु.ल., सामाजिक संशोधन पध्दती, म.वि.ग्र.नि.मं. नागपूर, पृ. 10.

७. Hokenson John, The Idea of Comedy history Theory, Critic, Resement Publishing New Jercy, P. 150.

८. उपाध्याय उदय नारायण एवं तिवारी गौतम, भारतीय स्थापत्य एवं कला मोतीलाल बनारसीदास, दिल्ली, 2001, पृ. 1

९. Vozderer Peter, Psychology of Entertainment Lorence Association New Jurcy, P. 367.

१०. जोगदेव हेमंत, क्रीडा पत्रकारिता, श्री विद्या प्रकाशन, पुणे, 2001, पृ. 1

११. Wyver John, The Moving Image : An International History of Film, Television & Video, John Wiley & Sons, 1989, P. 5

१२. धारुरकर वि.ल., संपादन कला आणि शास्त्र, चैतन्य प्रकाशन, औरंगाबाद, पृ. 105.

१३. Stoddart Helen, Rings of Desire : Circus History & Representation, Manchester University Press, U.K. 2000, P.1.

१४. शर्मा मुकूंद, विज्ञापन की दुनिया, प्रतिभा प्रतिष्ठाण नई दिल्ली 2010, पृ. 12.